क्र.साप्रवि/रवका/न.क्र.६६४/ 19047

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दिनांक : 21 JUN 2011

# परिपत्रक

विषय : नक्षलग्रस्त/आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत.

........

तदर्थ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.०१.२००३ मधील परिच्छेद क्र.४ (चार) अनुसार आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून वेतनगट १ ते ४ मधील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यास त्या क्षेत्रात असे पर्यंतच्या काळात त्याने धारण केलेल्या मुळ पदाच्या नजिकच्या/पदोन्नतीची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतन निश्चितीचा लाभ देण्यात यावा. ज्या कर्मचाऱ्यांना सेवाअंतर्गत आश्वाशित प्रगती योजनेचा (सा.आ.७४(क)/१११(क)) लाभ दिलेला आहे, त्यांना आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल. ही एकस्तर पदोन्नतीची योजना संबंधित कर्मचारी आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच अनुज्ञेय राहील. त्या क्षेत्रातून कर्मचारी बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर तो त्याच्या मुळच्या संवर्गाच्या वेतनश्रेणीत पुर्वीच्या वेतनाच्या अनुषंगाने वेतन घेईल, असे निर्देश देण्यात आहेत.

२. तथापि, असे निदर्शनास आले की, अधिकारी/कर्मचारी यांची आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्राबाहेर बदली झाल्यानंतर सुध्दा काही प्रकरणी एकस्तर पदोन्नतीचा लाभ काढून न घेता तसाच सुरू ठेवण्यात आला आहे. याबाबत निर्देश देण्यात येतात की, अशा प्रकरणांचा शोध घेऊन आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्राबाहेर बदली झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला एकस्तर पदोन्नतीचा लाभ बदलीवर कार्यमुक्त झाल्याच्या तारखेपासून बंद करण्यात यावा. तसेच एकस्तर पदोन्नतीपोटी अदा केलेल्या शिल्लक रक्कमेची वसुली त्वरित करण्यात यावी.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेट या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

21/6/2011
*(विजय भि. बागुल)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

*D:\O&M\Circular-F.N.664.doc*
*18/06/2011*